# बीडीओ मूळूक यांच्या आशीर्वादाने इंजिनिअरांकडून ५ हजार घरकुलामागे १५ कोटी रुपयांची लूट?


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564


**घरकुलाच्या कोट्यावधी रुपयांतील कोणाला किती टक्के जातात?**

**घरकुलांचे हप्ते काढण्यासाठी इंजिनिअरांकडून लाभार्थींची अडवणूक करून सर्रास लूट?**


■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २३१ ■ शनिवार दि.१० मे २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रु. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 231 ■ Saturday Dt.10 May 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4


# माजलगाव पंचायत समितीच्या घरकुल विभागात कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार ?

## प्रतिघरकुल ३० हजार रुपयांची वसुली; इंजिनिअर मुकुंद शिंदे, ज्ञानेश्वर जायभाये, अक्षय गात, शशांक जोगदंड, सुभाष चव्हाण यांच्याकडून होतेय लूट?

**पैसे दिल्याशिवाय हप्ते टाकत नाही अशी दिली जाते धमकी; पैसे नाही दिले तर काहीतरी त्रुटीचे कारण दाखवून लाभार्थ्यांची पिळवणूक?**

**महाराष्ट्र आरंभ चे पत्रकार सुनिल थोरात यांनी बीडीओ यांना चौकशी केली असता त्यांच्याकडून इंजिनिअरांची पाठराखण!**

**बीडीओ म्हणतात पुरावा द्या, इंजिनिअर रोजगारसेवकाद्वारे पैसे घेतात मग पुरावा कसा मिळणार?**

**पुरावा नाही दिला तर लूट थांबणार नाही का? जिल्हाधिकारी जॉन्सन साहेब गोरगरीबांची लूट थांबवा?**

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव पंचायत समिती कार्यालयाचा अजबच कारभार असून यामध्ये इंजीनियर यांच्याकडून घरकुल लाभार्थ्यांची लूट केली जात आहे. यामध्ये अंदाजे ५ हजार घरकुला मागे ३० हजार रुपये प्रमाणे १५ कोटी रुपयांची लूट केली जात आहे. हि लुट बीडीओ मुळूक यांच्या आशीर्वादाने चालू आहे अशी लाभार्थ्यांमध्ये कुजबूज आहे. खऱ्या अर्थाने या प्रकरणांमध्ये बीडीओ यांच्यावर कारवाई करून निलंबित करणे गरजेचे आहे. याकडे जिल्हाधिकारी लक्ष घालणार का? असे अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहे.

माजलगाव पंचायत समितीमध्ये विविध घरकुल योजनांमधून लाभार्थ्यांना घरकुल आलेले आहेत. त्यामुळे लाभार्थ्यांनी घरकुलाचे बांधकाम हे पूर्ण केलेले असताना सुद्धा हप्ता काढण्यासाठी त्यांची पिळवणूक केली जाते. इंजिनीयर यांनी लाभार्थ्यांकडे रोजगार सेवकाद्वारे या पैशांची मागणी करून पैसे दिले नाही. तर हप्ता टाकत नाही. अशी धमकी दिली जाते, व जे लाभार्थी पैसे देत नाहीत त्यांचा हप्ता निघत नाही. कारण विचारले असता. काहीतरी त्रुटी आहे त्यामुळे तुमचा हप्ता निघत नाही. असे इंजिनियर द्वारे सांगण्यात येते. या प्रकरणाविषयी बीडिओ मुळूक यांना महाराष्ट्र आरंभ चे पत्रकार सुनिल थोरात यांनी चौकशी केली असता. त्यांनी म्हटले की, कोणीही इंजिनियर पैसे घेत नाहीत. असे सांगून त्यांनी एक प्रकारे इंजिनिअर यांची पाठराखणच केलेली आहे. त्यामुळे या लुटीमध्ये बीडिओ मुळूक यांचा पण समावेश आहे का ? अशी कुजबूज घरकुल लाभार्थ्यांमध्ये ऐकायला मिळत आहे. बीडिओ म्हणतात पुरावे द्या कारवाई करू पण हे इंजिनियर एवढे चतुर आहेत की स्वतः हातात पैसे




घेत नाहीत. रोजगार सेवकाद्वारे पैसे घेतले जातात. त्यामुळे पुरावा देणार कसा?

आणि जर पुरावा दिला नाही तर ही लूट थांबणार नाही का? असा सवाल यावेळी संतप्त लाभार्थ्यांनी केला आहे. माजलगाव पंचायत समितीमध्ये अनेक विभागांमध्ये भ्रष्टाचार होत असून, हा १५ कोटी रुपयांचा भ्रष्टाचार फक्त इंजिनियरां मार्फत घरकुल विभागात होत आहे. याची तक्रार बीडिओ यांच्याकडे केली असता त्यांनी याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसत आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी जॉन्सन साहेब व जिल्हा परिषद सीओ जीवने आपल्याला माजलगाव पंचायत समितीमध्ये लक्ष देण्याची गरज आहे. आणि लाभार्थ्यांची होणारी


▶ पान २ वर




## शिवसेनेने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरास देशाभिमान दाखवत मुस्लिम तरुणांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद : गिराम

बीड । प्रतिनिधी

पाकिस्तानी दहशतवाद्या विरोधात भारतीय सैन्यानी सुरु केलेल्या युद्धात शहीद भारतीय जावनाच्या शौर्याप्रति सदभावना म्हणून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी आज बीड शहरांत रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरास देशाभीम असणाऱ्या तरुणांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला. विशेष



म्हणजे मुस्लिम बांधवानी ही रक्तदान करून देशाप्रति सदभावना दाखवली.

याशिबिरास सह संपर्क प्रमुख बाळासाहेब अंबुरे, दैनिक झुंजार नेता चे संपादक अजित वरपे, दैनिक सामना चे जिल्हाप्रतिनिधी उदय जोशी सर, जिल्हा संघटक नितीन धांडे, उपजिल्हाप्रमुख हनुमंत जगताप, कर्मवीर परिवाराचे सोमनाथ धांडे, गणेश जाधव, राहुल


▶ पान २ वर


## अवैध वाळुची चोरटी वाहतुक करणाऱ्या वाहनाविरुध्द माजलगाव शहर पोलीसांची कारवाई



माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव शहरात गोपनिय माहीतीच्या आधारे माजलगांव शहर पोलीसांनी माजलगांव शहरातील समता कॉलनी येथील आनंद बालरुग्नालय समोर समोर ०२.२० वाजताचे दरम्यान एक अवैधरीत्या वाळुची चोरटी वाहतुक करत असलेला पासिंग क्रमांक नसलेला ४०७ टेम्पो वाळुसह पकडुन टेम्पो किंमती २,००,०००/– रुपये व दोन ब्रास वाळु किमती १०,०००/– रुपये असा एकुण २,१०,०००/– रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरची कारवाई नवनित कॉवत, पोलीस अधीक्षक बीड, श्रीमती चेतना तिडके, अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, अनिल चोरमले, उपविभागीय पोलीस अधिकारी अंबाजोगाई, अति. पदभार माजलगांव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोहेकॉ नंदकिशोर परळकर, रामेश्वर खेत्रे, चालक/पोलीस अंमलदार सहाधु कोकाटे यांनी केली आहे.

## बीडमधील बेकायदेशीर ले आऊट मंजुरी प्रकरणी कोर्टाने मुख्याधिकाऱ्यांना बजावली नोटीस

**गटनेते फारूख पटेल यांनीही जिल्हाधिकाऱ्यांकडे केली होती तक्रार**

बीड । प्रतिनिधी

येथील नगर परिषदेच्या हद्दीतील सर्व्हे नं.३५ तरफ गिराममधील १५६५० चौ. मी. जमिनीच्या बेकायदेशीर लेआउट मंजुरी प्रकरणात दाखल याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दखल घेतली आहे. या प्रकरणात न्यायालयाने अंतरीम आदेश देत आव्हानात्मक लेआउट मंजुरीचा निर्णय रीट याचिकेच्या अधिन असेल असे स्पष्ट करत नगर विकास विभागासह बीड न.प.च्या मुख्याधिकाऱ्यांना नोटीस बजावली आहे. अशी माहिती न.प.चे गटनेते तथा तक्रारदार फारूख पटेल यांनी दिली आहे.



या प्रकरणात पटेल याचिकाकर्ता नसले तरी त्यांनी सदरील लेआउट बेकायदेशिर असून तो रद्द करावा अशी तक्रार जिल्हाधिकाऱ्यांकडे केलेली आहे.

बीड शहरातील सर्व्हे नं. ३५ तरफ गिराममधील जागेचे लेआउट तत्कालीन मुख्याधिकारी गुट्टे यांनी मंजुर केले होते. मात्र सदरील जागेचे प्रकरण न्यायप्रविष्ट असतांना बदली झाल्यानंतर त्यांनी हे लेआउट मंजुर केल्याचा ठपका ठेवत राज्य शासनाने संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले होते. नेमक्या त्याच जागेचे अंतीम लेआउट विद्यमान


▶ पान २ वर







# आरंभ हैं प्रचंड!

## संघर्षाची वाटचाल, यशाची प्रकाशवाट उजडली नवीपहाट
## धाडसी निस्वार्थी, निर्भीड कामगिरी

# शुभम घोडके यांचा वृत्तपत्र विक्रेता ते युवा पत्रकार असा प्रवास

उपसंपादक : नवनाथ आडे

संकट असोत किती, मनोधैर्य भक्कम असेल तर यश अटळ असतं! या विचारानेच स्वतःचं साम्राज्य उभा करणारे युवा पत्रकार त्यांच्या अथक परिश्रमाने आणि समाज हितार्थ ते समाजामध्ये प्रेरणास्त्रोत ठरत आहेत नित्यनेमाने दररोज पायी चालत वृत्तपत्र वाटप ते जिल्हा दैनिकाचा प्रतिनिधी कार्यरत असणारे धाडसी निस्वार्थी निर्भीड धारदार लेखणीचा बुलंद आवाज म्हणून गेवराई तालुक्यात पराचित असलेलं नाव म्हणजे श्री.शुभम घोडके यांची वाटचाल जेवढी संघर्षाची तेवढीच प्रेरणादायी आहेच पण् कुठल्याही गोष्टीचा योग महत्त्वाचा असतों त्यांच्या जीवनात तसाच योग चालून आला २०११साली वृत्तपत्र वाटप करत असताना थेट त्यांच्यावर गेवराई शहर प्रतिनिधी पदाची जबाबदारी देण्यात आली त्यानंतर पत्रकार म्हणून काम करण्याची संधी त्यांना वयाच्या सोळाव्या वर्षी मिळाली होती पत्रकार हा नावलौकिक सर्व दूर पर्यंत झाला.

अतिशय लहानपणापासून पत्रकारितेचे बाळकडू त्यांनी मिळवलंय, त्यांच्या कुटुंबात कुठलाही पत्रकारिता क्षेत्रात वारसा नाहीं आपल्या मेहनतीच्या बळावर काहीतरी मोठं करण्याची जिद्द त्यांना होती. घरात कोणाचाही मार्गदर्शन नसताना संघर्षातून स्वतःच अस्तित्व निर्माण केलं आहे पत्रकरिता क्षेत्रात त्यांची ठसठशीच ओळख आहे सामाजिक प्रश्नांवर प्रकाश टाकत लोकांना न्याय मिळवून देण्याचं काम त्यांनी केलं समाजातील सकारात्मक बदल आणि लोकांच्या समस्या समोर आणल्या. वृत्तपत्र क्षेत्रात काम करत असताना आपल्या धारदार लेखणीतून भल्या भल्यांना घाम फोडण्याचं काम त्यांनी निर्भीड निस्वार्थी प्रयत्नात केले. त्यांच्या या कामाची धडपड आजही त्यांना स्वस्त बसू देत नसल्याने दिसून येते. स्वतःच्या कामाबरोबर लोकांच्या कल्याणासाठी त्यांनी पत्रकार क्षेत्र निवडले असुन सर्वच बाजूंनी प्रतिकूल परिस्थितीत स्वत:साठी जिद्दीनं वाट शोधत राहिले आईच्या कष्टांतून प्रेरणा घेत पत्रकार बनण्याचं स्वप्न दहावीच्या इयत्तेपासूनच बाळगत होतें अखेर पूर्ण करत त्यांची परिस्थिती आता त्यांनी संघर्ष करुन सुधारली असली तरी ते कधीचं विश्वास डगमगू देत नाहीत! हार मानत नाहीत

आपल्या लेखणीच्या माध्यमातून सत्याची बाजू रेटून धरणारे युवा पत्रकार अर्थातचं आपल्या सर्वांचे लाडके युवा आदर्श असलेले श्री शुभम घोडके एका सर्वसामान्य गरीब कुटुंबातला देवमाणूस आहे पत्रकारितेचं बाळकडू खऱ्या अर्थाने मिळालं हेही तेवढचं खरं.समाजासाठी काहीतरी करण्याची जिद्द त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. बस तेव्हाचं त्यांनी ठरविले. पत्रकारितेची आवड मुळात होतीचं. मग याचं मार्गाने जाऊन आपली आवड जोपासत एक यशस्वी पत्रकार होण्याचं ध्येय त्यांनी निश्चित केलं.सुरवातीला या क्षेत्रातील माहिती त्यांना नव्हती. पण ध्येय ठरलेलं होतं एक यशस्वी बनायचचं आणि हेचं उद्दिष्ट समोर ठेवत सुरू झाला त्यांचा थक्क करून सोडणारा थरारक जीवन प्रवास. सुरवातीच्या काळात वृत्तपत्रांचे गठ्ठे बांधता बांधता पायी चालत व्यापारी बांधवांना वृत्तपत्र वितरित करण्याचे काम त्यांनी चोखपणे पार पाडत आपल्या ध्येयाशी ते एकनिष्ठ राहिले. या संधीचे खरोखर सोने केले वृत्तपत्र वाटप करत असताना दररोज नित्यनेमाने मन लावून बातम्या वाचायचे आणि एका एम्पोरियम इथून रुलिंग पेजवर लिहून पाहता पाहता पत्रकारितेची बरीचशी माहिती त्यांना अवगत झाली होती. त्यानिमित्ताने ओळख सर्वदूर पसरत गेली. यातूनचं शुभमभाऊ चा प्रचंड आत्मविश्वास वाढत गेला. थांबला तो संपला हे शुभमभाऊ चांगलेचं ओळखून होते. म्हणून न थांबता त्यांनी पुढे खूप मोठे धाडस करत मोठं मोठ्या बातम्या प्रकाशित केल्या आणि त्यामध्ये ते यशस्वी देखील झाले. समाजात घडणाऱ्या घडामोडी मग त्या चांगल्या असोत की वाईट, या प्रखरपणे मांडण्याचे धाडस त्यांच्यात आहे पेनाच्या शाईतूनरोखठोक वेळ आली तर जो चुकला तो ठोकला अशा भूमिकेत त्यांची लेखणी अनेक वेळेला पाहायला मिळालीच. बीड जिल्हा दैनिकाला काम करत आहेत आपल्या लिखाण कामाला सुरुवात करत असताना लेखणीतून शब्दांची धार लागताच ऑन द स्पॉट लोकांची कामे मार्गी लागतात याचा आनंद त्यांना सातत्याने होतो असा अनेक वेळा अनुभव आला म्हणून प्रमाणिकपणे लेखणीतून न्याय मिळवून दिला आहे यापुढेही देतील. गरिबीची जाण असणारा, सामान्यात मिसळणारा, न्यायदेवता म्हणून मोलाचे काम करणारा लेखणीचा अवलिया शुभम भैय्या घोडके यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा..!!

# खरीप हंगाम पूर्व जिल्हास्तरीय कृषी निविष्ठा विक्रेते बीड यांची कार्यशाळा

बीड | प्रतिनिधी

कृषी निविष्ठा विक्रेत्यांची जिल्हास्तरीय कार्यशाळा आज दि.०८.०५.२०२५ रोजी बीड येथे पार पडली. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी श्री. मनमोहन कलंत्री, राष्ट्रीय अध्यक्ष ऍग्रो इनपुट डीलर्स असोसिएशन दिल्ली होते तर प्रमुख पाहुणे व मुख्य मार्गदर्शक म्हणून डॉ. रामचंद्र धायगुडे. तंत्र अधिकारी कृषी आयुक्तालय पुणे, जिल्हा आधिक्षक कृषी अधिकारी श्री.एस.एम. साळवे, कृषी विकास अधिकारी श्री.एस.एस.सय्यद, कृषी उपसंचालक श्री जाधवर साहेब, उपविभागीय कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, मोहीम अधिकारी श्री सयाप्पा गरंडे, सचिन धस महाबीज प्रतिनिधी, श्री सय्यद इफ्फको खत कंपनी प्रतिनिधी, कृषी अधिकारी पंचायत समिती आणि जिल्ह्यातील कृषी निविष्ठा विक्रेते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. धायगुडे यांनी कृषी निविष्ठांच्या गुणवत्ता नियंत्रणाचे महत्त्व विषद केले. त्यांनी खताचा संतुलित वापर, माती परीक्षण आधारित खत वापर, फवारणी करताना घ्यावयाची काळजी, आधुनिक शेती पद्धती आणि निविष्ठांच्या योग्य वापराबाबत मार्गदर्शन केले. येणा-या खरीप हंगामात विक्रेत्याकडून अनावधाने किवा हेतूपरस्पर चुकीचे निविष्ठा वाटप होणार नाही तसेच अनुदानीत खतासोबत आवश्यकता नसलेल्या खतांची लिंकिंग होणार नाही याबाबत सूचना दिल्या. बियाणे विक्री बाबतीत साथी पोर्टल बाबत विक्रेत्यांच्या अडचणी यावर सविस्तर चर्चा केली.

जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी श्री सुभाष साळवे यांनी ज्यादा दराने बियाणे, खते विक्री करू नये, अधिकृत कंपनी व वितरकामार्फतच कृषी निविष्ठा खरेदी करून विक्रीस ठेवण्यात याव्यात, तसेच यामध्ये गैरप्रकार केल्याचे आढळून आल्यास बियाणे कायदे, खत नियंत्रण आदेश व अत्यावश्यक वस्तु अधिनियम अंतर्गत कारवाई करण्यात येईल, वेळप्रसंगी पोलिसात गुन्हे दाखल करण्यात येतील असे सांगितले.

कार्यक्रमामध्ये श्री. सय्यद, जिल्हा प्रतिनिधी इफ्फको यांनी नॅनो युरिया व नॅनो डीएपी खतांचा वापर वाढविण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. प्रातिनिधिक स्वरुपात ई-पॉस मशीनचे मान्यवरांच्या हस्ते वितरण केले. महाबीजचे जिल्हा प्रतिनिधी श्री. सचिन धस यांनी साथी पोर्टल विषयी सखोल माहिती दिली. या पोर्टलच्या माध्यमातून कृषी निविष्ठांच्या (बियाणे) वितरणाची प्रक्रिया अधिक सुलभ आणि पारदर्शक कशी होईल, याबद्दल त्यांनी मार्गदर्शन केले.

# तरुणांनी उद्योग-व्यवसायाकडे वळावे : प्रा. अतुल दुबे

परळी वैजनाथ / प्रतिनिधी

नोकरी ही मर्यादित उत्पन्नाची शाश्वत वाट नसून उद्योग-व्यवसाय हे आर्थिक सुबत्तेचे द्वार आहे. तरुणांनी नोकरीच्या मागे धावण्याऐवजी स्वावलंबी होऊन व्यवसायाची दिशा स्वीकारावी, असे मत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे युवक नेते तथा जय महाराष्ट्र प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा. अतुल दुबे सर यांनी व्यक्त केले.

शुक्रवार, ९ मे रोजी मोंढा मार्केट येथील हैदराबाद बँकेजवळ 'श्री वैद्यनाथ प्लास्टिक अँड क्रॉकरी' या नव्या व्यवसाय दालनाचे उद्घाटन शिवसेना युवक नेते प्रा. अतुल दुबे यांच्या हस्ते संपन्न झाले. प्रारंभी श्री लक्ष्मण बिकनुरे सौ.मीना बिकनुरे (कुंभार) यांच्या हस्ते श्री सत्यनारायण महापूजा करण्यात आली.

उद्घाटन समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते ऍड. मनोज संकाये, वैद्यनाथ देवल कमिटीचे विश्वस्त रघुनाथ देशमुख, उद्योजक रामेश्वर खर्डे, दीपक कुरील, रोहित शिंदे, शुभम दीक्षित, केतन झोपे, राहुल पाचणकर आदी मान्यवर उपस्थित होते. या वेळी दालनाचे संचालक नरेश बिकनुरे (कुंभार) यांनी मान्यवरांचे शाल, श्रीफळ आणि पुष्पहार देऊन सन्मान केला.

शिवसेना युवक नेते प्रा. अतुल दुबे सर आपल्या भाषणात पुढे म्हणाले, सध्याची सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती लक्षात घेता तरुणांनी नोकरीच्या प्रतिक्षेपेक्षा स्वतःच्या व्यवसायाची घडण घडवावी. उद्योगात अपार संधी आहेत; गरज आहे ती फक्त आत्मविश्वास आणि धाडसाची असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन महेश यादव यांनी तर आभार प्रदर्शन नितीन पाचनकर यांनी केले. उद्घाटनाच्या निमित्ताने दिवसभर 'श्री वैद्यनाथ प्लास्टिक अँड क्रॉकरी' या नवीन दालनास स्थानिक नागरिक, उद्योजक, आणि ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केली जिल्हा रुग्णालयाची पाहणी

## रुग्णाला दर्जेदार सेवा मिळायला हवी, त्यांनी यंत्रणांमध्ये पारदर्शकता, वेळेवर उपचार आणि स्वच्छतेवर भर द्यावा : जिल्हाधिकारी जॉन्सन





बीड | प्रतिनिधी

बीश जिल्हाधिकमी विवेक जॉनस्र पांरी आज नित्या पाल्याची अचानक पाहणी करत रुपमोचा, वैद्यकीय सुविधा आणि व्यपाकपनाची सखोल माहिती घेतली. त्यांनी हगभनयातील विविध विभागांना भेट देऊन रुग्णांती आणि कर्मचाऱ्यांसी पेट संजय साधरण. पाहणी सम्यान जिल्हाधिकान्यांनी ओपीडी, इनडोअर पॉई, औषध विरुष कम, ओपोस्त किएटा, नहित्ता व बालरोग विभाग, तसेच प्रयोगमाळा विभागांची तपसरी फेरली. सम्यांकडून उपचार, औषधे, स्वच्छता आणि कर्मचारी वर्गाच्या लघुकीबाबत हेट माहिती पेलली. कारी कांनी सल्यान प्यक केले तर करहीन किरकोळ अडचणी मांडत्यस जिलाधिकाचांनी सातर उसासनाला सूम्सा रिल्या की, अन्त्येक सणाता राजेंदर सेबा मिळायला हवी. त्यांनी पारदर्शकता, बेलेबर उपवार आणि स्वच्छनेक भर देण्याचे निर्देन दिले.

डॉ. संजय राऊत, आरएमओ डॉ. संतोष सहागे, बड़ा विभागाने अतो दॉ. लक्ष्मीकांत, डॉ. रतुमंत पारखे, मुख्य अपीसेविकारमा निरी, प्राचार्य डॉ. सुवर्णा बेदरे आणि इतर विभागस्थित होते. पणीच्या शेवटी जिल्हाधिकाचांनी चांगली सेवा देणाऱ्या कर्मयाचे कौतुक करुन त्यांना शाब्बासकी दिली. काही आदेशही त्यांनी रिले. जिताधिकाऱ्यांच्या या पत्रयीमुळे आरोग्य संमेलना बाढणार असून, नागरिकांना अधिक बांगत्वा सेवा मिसम्याची अपेक्षा व्यक होत आहे. स्थाप्रमानाने त्यांच्जा सूवनांचे तात्काल पालन करण्याचे आओवासर दिसे आहे.

# भाऊ ही सज्ञा सद्गुरू बंकटस्वामी महाराजांनी वामनभाऊंना दिली : महंत विठ्ठल महाराज शास्त्री

बीड | प्रतिनिधी

भाऊ ही सज्ञा सद्गुरू बंकटस्वामी महाराजांनी वामनभाऊंना दिली. आमचे कुळ आणि मूळ बंकटस्वामी आहे, असे प्रतिपादन महंत विठ्ठल महाराज शास्त्री गहीनाथ गडकर यांनी केले संत बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवात तिसऱ्या दिवसाचे कीर्तन पुष्पगुताना ते बोलत होते. यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, मुकुंदराज संस्थांचे मठाधिपती किसन महाराज पवार, गाथा कंठस्थ मारुती महाराज चोरमले, अर्जुन महाराज शिंदे, जनार्धन महाराज बांगर, श्री ह भ प नाना महाराज कदम, सुरेश महाराज जाधव, यांच्यासह हजारो भावी भक्तांची उपस्थिती होती.

बीडच्या श्रीक्षेत्र नेकनूर येथे वारकरी संप्रदायातील महान संत बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवास तिसऱ्या दिवसाचे कीर्तन पुष्प महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार श्री ह भ प महंत विठ्ठल महाराज शास्त्री गहिनीनाथगडकर यांचे संपन्न झाले. यावेळी त्यांनी संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या

आजी संसार सुफळ जाला गे माये ।



देखियले पाय विठोबाचे ।।
तो मज व्हावा तो मज व्हावा ।
वेळों वेळां व्हावा पांडुरंग ।।
बापरखुमादेविवरू न विसंबे सर्वथा ।
निवृत्तीने तत्त्वतां सांगितले ।।

या अभंगावर चिंतन मांडले यावेळी बोलताना विठ्ठल महाराज म्हणाले की. संत बंकटस्वामी महाराज आणि संत वामनभाऊ महाराज यांचे गुरूशिष्य अतूट नाते होते. एका अधिकमासात कीर्तन महिनाभर झालेला विषय परत आला नाही पाहिजे. अस बंकटस्वामी महाराज यांनी सांगितले. त्यावेळी संत वामनभाऊ यांनी किर्तन केले त्यावेळी स्वामी खुश झाले आणि त्यानंतर भाऊ ही सज्ञा स्वामी महाराजांनी दिली.असा इतिहास विठ्ठल महाराज यांनी सांगितला. पुढे बोलताना स्वामीच्या काकडा भजनाला १० हजार भाविक भक्त पहाटे उपस्थित राहत.रामकृष्ण हरी सप्ताह स्वामी महाराजांनी सुरुवात केली. बंकटस्वामी हे कामधेनू आहेत त्या कामधेनुचे दूध आम्हाला प्यायला मिळाले असेही महाराज म्हणाले.

आचार, विचार आणि संस्कार.. या गोष्टी आध्यात्मिक साधकांनी पाळल्या पाहिजेत. स्वामी महाराज हे वारकरी पंथाचे मालक होते. प्रत्येकाने आपले मूळ आणि कुळ शोधले पाहिजे. संत वामनभाऊ महाराज यांचे कुळ आणि मूळ स्वामीची गादी आहे त्यामुळेच तर वामन भाऊंच्या आरतीत कृपा अखंड बंकटस्वामीची असा उल्लेख आढळतो. आम्ही स्वाभिमाने सांगतो आम्ही स्वामीचे आहोत काहीना नाव घ्यायला संकोच होतो असे विठ्ठल महाराज म्हणाले.

यावेळी साथ संगत श्री ह भ प सर्वश्री रोहिदास महाराज शिंदे,वारकरी भजन स्वरवैभव अशोक शास्त्री महाराज, वसंत महाराज शिंदे, सतीश महाराज जाधव, मृदंग साथ राम महाराज, अभय महाराज कोकाट यांच्यासह बंकटस्वामी महाराज फडावरील सर्व टाळकरी मंडळी गुरुजन मंडळी व विद्यार्थी मंडळी उपस्थित होते.

पान १ वरून...

## माजलगाव पंचायत समितीमध्ये इंजिनिअर...

लूट थांबवावी व इंजिनिअरांची सखोल चौकशी करून व घरकुलांची पाहणी करून त्यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी लाभार्थ्यांकडून होत आहे. घरकुलच्या विभागामध्ये कोट्यावधी रुपयांचा भ्रष्ट करत असताना वरिष्ठाकडून पाठराखंड कशामुळे? पाठराखण न करता तात्काळ कारवाई करणे गरजेचे आहे. जिल्हा परिषद विभागाचे मुख्याधिकारी यांनी या प्रकरणाकडे विशेष लक्ष घालून सखोल चौकशी करणे आणि कायदेशीर कारवाई करण्याची मागणी घरकुल लाभार्थ्यांकडून होत आहे.

## शिवसेनेने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरास देशाभिमान...

जामकर, नंदकुमार येवले, सुरेश तात्या शेटे, माजी नगरसेवक सुधीर भांडवले, यांनी भेट दिली. या शिबिरास उपजिल्हाप्रमुख संजय महाद्वार, लक्ष्मण बहिरवळ, सुशील पिंगळे, रतन तात्या गुजर, नवनाथ प्रभाळे, सरपंच प्रदीप कोटुळे, अतुल लोणकर, योगेश वादे, अझर सय्यद, ज्ञानेश्वर दाभाडे, सुजित गिराम, गिरीश गिराम, वैभव प्रभाळे, महेश भोसले, सौरभ इंगोले यासह अनेक तरुणांनी रक्तदान शिबिरास सहभाग नोंदवला.

## बीडमधील बेकायदेशीर ले आऊट मंजुरी प्रकरणी...

मुख्याधिकारी अंधारे यांनी मंजुर केल्याची तक्रार गटनेते फारूख पटेल यांनी पुराव्यांसह जिल्हाधिकाऱ्यांकडे केलेली आहे.

सदरील लेआउट रद्द करून संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांविरूध्द फौजदारी गुन्हा दाखल करावा अशी मागणी पटेल यांनी तक्रारीद्वारे केलेली आहे. दरम्यान याच प्रकरणात दाखल याचिकेची मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दखल घेतली आहे. खंडपीठासमोर झालेल्या सुनावणीत न्यायालयाने अंतरीम आदेश देत आव्हानात्मक लेआउट मंजुरीचा निर्णय रीट याचिकेच्या अधिन असेल असे स्पष्ट केले आहे. त्याचबरोबर न्यायालयाने नगर विकास विभाग, नगररचना सहसंचालक, जिल्हाधिकारी बीड, मुख्याधिकारी न.प.बीड, नगररचनाकार बीड यांना नोटीस बजावली असून त्यांना उत्तर दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत. याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. सय्यद तौफीक यांनी युक्तीवाद केल्याचे फारूख पटेल यांनी म्हटले आहे.

# अहिल्यादेवी होळकरांच्या स्मरणार्थ राज्यातील एकल महिलांचे सर्वेक्षण व्हावे : बाजीराव ढाकणे

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यात यावर्षी पुण्यश्लोक अहिल्या देवी होळकर यांची ३०० वी जयंती साजरी होते आहे. राज्य सरकारनेही त्यांना अभिवादन करण्यासाठी मंत्रिमंडळ बैठक त्यांच्या थेट जन्मस्थळी म्हणजे चौंडी येथे घेतली आहे. या बैठकीत अहिल्यादेवी यांच्या जन्मस्थळी विविध विकास योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे, त्याबद्दल राज्य सरकारचे खुप खुप आभार! पण एक खंत यानिमित्ताने सरकारने महाराष्ट्र राज्यातील एकल महिला पुनर्वसन हा कार्यक्रम हाती घ्यायला हवाच असे मत साऊ एकल महिला समितीचे बाजीराव ढाकणे यांनी व्यक्त केले आहे.

अहिल्यादेवी या एकल महिला होत्या. एक एकल महिला किती मोठे कर्तृत्व गाजवू शकते याचे त्या वस्तुपाठ आहेत. एकल महिलांसाठी त्या प्रेरक आहेत. तेव्हा त्यांच्या स्मरणार्थ राज्यात एकल महिला पुनर्वसन धोरण व्हावे. महाराष्ट्रात आज विधवा, परित्यक्ता, घटस्फोटित महिलांची संख्या खूप मोठी आहे. या महिलांचे पुनर्वसन करण्यासाठी व सरकारने धोरण आखण्यासाठी त्यांची संख्या पुढे येणे आवश्यक आहे. त्यामुळे राज्यातील एकल महिलांचे सर्वेक्षण होणे आवश्यक आहे. अहिल्यादेवी यांच्या स्मरणार्थ त्यानुसार धोरण तयार होऊ शकेल. एकल महिलांची संख्या किती असू शकते ? देशाच्या २००१ च्या जनगणनेत एकल महिला ५ कोटी तर २०११ साली ७ कोटी ३० लाख होत्या. महाराष्ट्रात आज ही संख्या प्रचंड असू शकते.



याचा एक पुरावा देत असल्याचे साऊ एकल महिला समितीचे बाजीराव ढाकणे यांनी सांगितले.

अहिल्यादेवी यांचे जन्मस्थान ज्या अहिल्या नगर जिल्ह्यात आहे. त्या अहिल्यानगर जिल्हा परिषदेने दोन वर्षापूर्वी ग्रामपंचायत स्तरावर एकल महिलांचे सर्वेक्षण केले. तेव्हा फक्त ग्रामपंचायत स्तरावर या एकल महिलांची संख्या १ लाख ७ हजार निघाली. त्यात १५ तालुक्यातील नगर पंचायत, नगरपालिका, महापालिका ही संख्या मिळवली तर ती संख्या २ लाख असू शकते. ही एका जिल्ह्याची स्थिती आहे. जर एका जिल्ह्यात दोन लाख एकल महिला असतील तर राज्यात ३६ जिल्ह्यात एकल महिलांची संख्या ७० लाखा पेक्षा जास्त असू शकते आणि पुणे, मुंबई, नागपूर, संभाजी नगर सारख्या मोठ्या शहरा तील मोठी संख्या बघता एकूण संख्या ८० लाखापेक्षा जास्त असू शकते. त्यांच्यावर अवलंबून असणारी दोन मुले धरली तर राज्याच्या लोकसंख्येत ही खूप लक्षणीय असेल. कोरोनात महाराष्ट्रात झालेले सर्वात जास्त मृत्यू आणि दारूने गावोगावी मोठ्या संख्येने मरणारे तरुण बघता ही एकल महिलांची संख्या खूप वाढली आहे. त्यामुळे एकल महिलांच्यासाठी धोरण तयार करण्यासाठी शासनाने सुरुवात म्हणून राज्यात एकल महिलांचे सर्वेक्षण करून अहिल्यादेवी यांच्या स्मरणार्थ भरीव आर्थिक तरतूद करावी.

हे सर्वेक्षण करण्यासाठी फार खर्च ही येणार नाही. ग्रामपंचायत क्षेत्रात त्या छोट्या गावात ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, आशा सेविका यांच्याकडे गावातील एकल महिला माहिती असतेच. ती फक्त वयोगटानुसार संकलन करायची आहे. शहरी भागात वॉर्ड ऑफिसर, अंगणवाडी व स्वयंसेवी संस्था मदत करू शकतील व एकल महिलाना नोंदणीसाठी ऑनलाईन app (प) बनवून त्या पद्धारे हि नोंदणी करता येईल. त्यामुळे हा कमी खर्चात होणारा सर्व्हे आहे. आज आपल्या आजुबाजूला असलेल्या या लाखो भगिनी असून ही लक्षात येत नाहीत. अदृश्य असलेला हा प्रश्न संख्या पुढे आली की दृष्यमान होईल व सरकार व समाज यांच्यासाठी नक्कीच काही करू शकेल. त्यामुळे अहिल्यादेवी यांच्या ३०० व्या जयंती निमित्त एकल महिलांच्या प्रश्नावर सर्वेक्षणाची घोषणा सरकारने करून कृति कार्यक्रम जाहीर करावा अशी मागणी साऊ एकल महिला समिती करत आहे. तरी राज्य सरकारने तातडीने पुढील कृती आराखडा तयार करावा असे आवाहन बाजीराव ढाकणे यांनी केले आहे.

# जयवंती नदीपात्र पाहणी करता प्रशासनाचा वेळ मारून नेण्याचा प्रयत्न



अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई जयवंती नदी पात्रातील अतिक्रमण काढण्यात यावे या मागणीसाठी डिजिटल मीडिया परिषदेचे अध्यक्ष अभिजीत लोमटे व सर्व सदस्य यांनी नगरपरिषद कार्यालयासमोर आमरण उपोषण केले होते या आंदोलनाचा पहिला भाग म्हणून जयवंती नदीपात्रात जाय मोक्यावर जाऊन तहसीलदार व मुख्याधिकारी यांच्या समितीने प्रत्यक्षात पाहणी करून आठ दिवसात अधिकृत परवानाधारक व अनधिकृत बांधकामाची यादी, अहवालाची प्रत उपोषणकर्ते अभिजीत लोमटे यांना देण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार आज नगरपरिषद कार्यालयात जयवंती नदी चा प्रत्यक्षात अहवालाची प्रत डिजिटल मीडिया परिषदेचे अध्यक्ष अभिजीत लोमटे यांना सर्व पत्रकार बांधवांच्या उपस्थितीत देण्यात येणार होती परंतु असे न करता प्रशासनाने चाल ढकल करण्याकरता व कसाही एक महिना वेळ मारून नेण्यासाठी आज अहवाल न देता तहसील व मुख्याधिकारी यांनी समिती गठीत केली आहे याची प्रत देण्यात आली.

या समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर अहवाल उपोषण करते यांना देण्यात येणार असे नगर परिषदेचे स्वच्छता निरीक्षक श्री अनंत वेडे यांनी उपस्थित पत्रकार बांधवांना सांगितले. जयवंती नदी पात्रातील अतिक्रमण हटाव मोहीम जयवंती नदी पात्रातील अतिक्रमण काढल्याशिवाय थांबणार नाही प्रशासन वेळ मारून नेण्याचा प्रयत्न करत असून वरिष्ठ अधिकाऱ्यांना याचा जाब मराठी पत्रकार परिषद व डिजिटल मीडिया परिषद यांच्यावतीने मंगळवारी विचारला जाणार असून या जाय मोक्यावर जाऊन पाहणी दरम्यान समिती सोबत डिजिटल मीडिया परिषद अंबाजोगाई ची टीम राहणे आवश्यक आहे जेणेकरून सर्व अंबाजोगाई करांना जयवंती नदीपात्राची मोजणी लाईव्ह पाहता येईल यासाठी डिजिटल मीडिया परिषद च्या वतीने प्रशासनाला समितीचे पत्र स्वीकारताना विनंती केली आहे तसेच सर्वांशी चर्चा करून पुढील आंदोलनाची दिशा लवकरच जाहीर केली जाईल, असे मत डिजिटल मीडिया परिषदेचे अध्यक्ष श्री अभिजीत लोमटे यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले आहे.

# हिंदू–मुस्लिमांचं श्रध्दास्थान हजरत मौलाली बाबांचा यात्रोत्सव

कडा । प्रतिनिधी



कडा येथील ग्रामदैवत तथा सर्वधर्मियांचं श्रध्दास्थान म्हणून नावलौकिक असलेल्या हजरत मौलाली बाबांचा यात्रोत्सव मंगळवार ६ मे पासून सुरू झाला असून सोमवारी दि.१२ मे रोजी मोठ्या उत्साहात यात्रा–उरूस संपन्न होणार आहे. आष्टी तालुक्यातील कडा हिंदू –मुस्लिम एकोपा जोपासणारं गाव म्हणून मराठवाड्यात नावलौकिक आहे. याठिकाणचा यात्रोत्सव सामाजिक एकतेचे प्रतीक मानला जातो.

कडीनदीच्या किनारी ग्रामदैवत तथा सर्वधर्मियांचं श्रद्धास्थान हजरत मौलाली बाबांची दर्गाह आहे. दरवर्षी सर्वधर्मिय ग्रामस्थ एकत्रितपणे खेळीमेळीच्या वातावरणात हा उत्सव साजरा करतात. व्यवसाय, नोकरीनिमित्त बाहेरगावी गेलेले नागरिक बाबांच्या यात्रेच्या निमित्ताने आवर्जून हजेरी लावतात. बुध्द पौर्णिमेला यात्रेला सुरूवात होते. पौर्णिमेच्या अगोदर येणाऱ्या बुधवारी हजरत मौलाली बाबांना संदल लावतात. यावर्षी सोमवारी दि.१२ मे रोजी यात्रा–उरूस असून सर्व ग्रामस्थ एकत्रित येऊन बाबांची सवाद्य छबीना मिरवणूक काढतात. बाबांच्या समाधीला फुलांची चादर अर्पण करून श्रीफळ, मलिदा, गुळ–खोब–याच्या शेरणीचा प्रसाद दाखवून भाविक–भक्त आपली इच्छापुर्ती करतात. त्याच दिवशी पहाटेच्या दरम्यान शोभेच्या रंगीत फटाक्यांची आतिषबाजी लक्षवेधी असते. हा नेत्रदीपक सोहळा पाहण्यासाठी महिला, पूरूष, बालगोपाळ देखील सहभागी होतात. तर दुसऱ्या दिवशी नामवंत मल्लांच्या कुस्तीची दंगल आयोजित करण्यात येते. नदीकाठी थाटलेल्या विविध दुकानांना विद्युत रोषणाईने सजविण्यात येते.यात्रेत आलेली मनोरंजनाची साधने यात्रेकरूंची लक्षवेधुन घेतात. कडयाची यात्रा म्हणजे हिंदू –मुस्लिम बांधवांच्या एकतेचं प्रतीक मानली जाते, यातूनच सामाजिक एकोप्याचे दर्शन अनुभवायला मिळते. हा यात्रोत्सव शांततेत साजरा करण्यासाठी सरपंच, उपसरपंच, ग्रा.प.सदस्य, यात्रा कमिटी, ग्रामस्थ, दर्गाचे आर्चक, पोलिस प्रशासन, एकत्रितपणे परिश्रम घेताना पहायला मिळतात. हेच हजरत मौलाली बाबांच्या यात्रेचं वैशिष्ट्य मानलं जातं.



# डॉ.सय्यद हुमायुद्दीन यांचा जशने शादी सोहळा थाटात संपन्न

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एडवोकेट बी.डी.हंबर्डे महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्रा.तथा प्रसिद्ध कवी सय्यद अल्लाउद्दीन यांचे चिरंजीव तथा आष्टी येथील सय्यद डेंटल क्लिनिकचे डॉ.सय्यद हुमायुद्दीन यांचा विवाह औरंगाबाद अर्थात छ.संभाजीनगर येथील डॉ.शेख अब्दुल कादर कादरी यांची कन्या डॉ.मेहवीश गौसिया हिच्याशी बुधवार दिनांक ७ मे २०२५ रोजी शहनाज फंक्शन हॉल येथे थाटात संपन्न झाला.

यावेळी सय्यद आणि शेख परिवारातील आप्त, स्नेही त्याचबरोबर न्यायालयाचे न्यायमूर्ती, मुंबई येथील कन्स्ट्रक्टर मलिक, पुणे येथील व्यावसायिक सय्यद मगदूम, डॉ.मुजाहिद, प्रा.नरहरी पवार, प्रा.अशोक भोगाडे, प्रा.अनंत देशमुखे, तात्यासाहेब शेंडगे, सचिन रानडे, चिंचाळा येथील माजी सरपंच अशोक पोकळे, दिगंबर पोकळे, गणेश धुमाळ, आत्माराम पोकळे पाटील, सोमीनाथ पोकळे, राजकुमार पोकळे, गौरव राजे निंबाळकर, अंबादास पोकळे, अनेक ग्रामस्थ, मित्र परिवार, रामकृष्ण हॉस्पिटलचे डॉ.संदीप हंबर्डे, डॉ.सायंबर तसेच पुणे, मुंबई, श्रीरामपूर, मराठवाड्यातील अनेक मान्यवर आणि कवी, साहित्यिक उपस्थित होते.

# भारत– पाकीस्तान युध्दादरम्यानच्या अफवांवर विश्वास न ठेवण्याता सतर्क राहावे : बीड पोलिस

बीड । प्रतिनिधी

पोलिस अधीक्षक बीड यांच्या माध्यमातून ०९/०५/२०२५ रोजी एक प्रेस नोट जारी करण्यात आली असून त्यामध्ये भारत– पाकीस्तान युध्दाच्या अफवाबाबत स्पष्टता व नागरीकांसाठी सुचना देऊन अफवांवर विस्वास न ठेवता सतर्क राहावे !. असे आवाहन करण्यात आले आहे. पाकीस्तान पुरस्कृत दहशतवादयांनी पहलगाम येथे दिनांक २२/०४/२०२५ रोजी केलेल्या भ्याड हल्याचा भारताने निषेध केला आहे., पाकीस्तान मधील नागरी वस्तीची सुरक्षीतता अबाधीत ठेवुन ऑपरेशन सिंदुर राबविले आहे. त्यामध्ये दहशतवादी तळ उधवस्त केले आहेत. त्यामुळे पाकिस्तान सिमावर्ती भागात हल्ले करत आहे. भारताकडुन त्यांचे सर्व हल्ले सक्षमपणे हाणून पाडण्यात भारतास यश येत आहे. परंतु तरीसुध्दा पाकिस्तानकडुन भारतामध्ये काही अफवा पसरवुन गोंधळाचे वातावरण निर्माण करण्यासाठी सोशल मिडीया हॅक करुन खोट्या अफवा पसरविण्याची शक्यता नाकारता येत नाही.



या अनुषंगाने सर्व नागरीकांना खालील मुद्दयावर बीड पोलीस दलातर्फे आवाहन करण्यात येत आहे. भारत एक संघ आहे, सर्वांना भारत एकसंघ असल्याची प्रचिती दाखवण्यासाठी एकजुटीने आपले देशाप्रतीचे कर्तव्याचे पालन करावे. अफवांवर विश्वास ठेवु नका, कोणतीही माहिती केवळ अधिकृत शासकिय स्त्रोतांकडुनच स्विकारा. सोशल मिडियावर चुकीच्या माहितीचा प्रसार करु नका अफवा पसरवणे कायदयाने दंडनीय आहे. सोशल मिडियाचा वापर करताना अनोळखी, संशयास्पद लिंकवर क्लीक करु नये. सोशल मिडीयाची काळजीपुर्वक हाताळणी करावी. लष्करी, निमलष्करी दलाच्या हालचालीबाबत काहीही प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष सोशल मिडियावर व इतरत्र माहिती प्रसारीत करु नये. स्थानिक प्रशासनाच्या सुचनेचे पालन करा. शाळा, कार्यालये, वाहतुक याबाबत बदल झाल्यास प्रशासन माहिती देईल. कोणतीही संशयास्पद हालचाल दिसल्यास पोलीस किंवा प्रशासनाशी त्वरीत संपर्क साधावा. नागरीकांना जातीय सलोखा राखण्यासाठी सर्व स्थरावर प्रयत्न करावेत, कोणतीही जातीय, धार्मिक तेढ निर्माण होईल असे कृत्य करु नये. भारत एक मजबुत आणि सजग देश आहे. नागरीकांनी शांतता राखावी, संयम बाळगावा आणि देशाच्या सुरेक्षेसाठी जागरुक राहावे. बीड जिल्हा पोलीस नियंत्रण कक्ष, येथे ०२४४२–२२२३३३ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे बीड पोलिस यांनी आवाहन केले आहे.

# माजलगाव नगरपालिकेत स्व हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे भवनाला जागा उपलब्ध : सोळंके

माजलगाव । प्रतिनिधी



दिनांक ३१ जानेवारी २०२५ रोजी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब यांना माजलगाव येथील नगरपरिषद अंतर्गत हिंदूहृदय सम्राट माननीय श्री बाळासाहेब ठाकरे सामाजिक भवन उभारण्यासाठी शिवसेना माजलगाव शहर प्रमुख धनंजय पापा सोळंके यांनी मुंबई येथे भेटून निवेदन दिले होते. मा उपमुख्यमंत्री एकनाथी शिंदे साहेब यांनी तातडीने माजलगाव नगरपरिषद मुख्याधिकारी यांना अ प्रमाणे कार्यवाही करावी असे आदेशित केले, मा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पत्र क्र ऊ मू का इ_७८३८९६२/२५ दि ७/२/२०२५ च्या अनुषंगाने माजलगाव शहरातील सर्वे नंबर ३७१ मधील खुली जागा स्वर्गीय हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे सामाजिक भवन तसेच सुशोभीकरण वृक्ष लागवड कुंपण घालने तसेच सार्वजनिक उपयोगासाठी उपलब्ध करून द्यावी असे आदेशित केले.

माजलगाव चे मुख्याधिकारी यांनी उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्या पत्रानुसार रीतसर प्रशासकीय ठराव घेऊन माजलगाव शहरातील सर्वे नंबर ३७१ मधील ३२५.५० स्क्वेअर मीटर एवढी जागा स्वर्गीय हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे सामाजिक भवन उपलब्ध करून दिली. या हिंदुरुदय सम्राट बाळासाहेब ठाकरे भवन ला जागा उपलब्ध व्हावी यासाठी विशेष प्रयत्न शिवसेना अल्पसंख्यांक प्रदेशाध्यक्ष माननीय सईद खान, युवा सेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप तालुकाप्रमुख तुकाराम येवले यांनी केले. वरील मान्यवरांचे आभार शिवसेना शहर प्रमुख धनंजय पापा सोळंके यांनी व्यक्त केले.

# एक थेंब जवानांसाठी रक्तदात्यांनो, पुढाकार घेत रक्तदान करा : ॲड.शेख शाहजेब

बीड । प्रतिनिधी

भारत–पाकिस्तान युद्ध सुरू आहे. यात काही जवान शहीद, तर काही जखमी होत आहेत. त्यांना वाचविण्यासाठी आपण पुढाकार घेत रक्तदान करावे, असे आवाहन जिल्हा रुग्णालय प्रशासनाने केले आहे. यासाठी या’ ठिकाणी करा रक्तदान बीड शहरातील सोमेश्वर मंदिरात सोमवारी रक्तदान करता येईल. तसेच गुरुवारी स्वामी समर्थ मंदिर, शनिवारी शनि मंदिर आणि पेंडगाव हनुमान मंदिरात शिबिराचे आयोजन केले आहे. याशिवाय आपण जिल्हा रुग्णालयातील रक्तपेढीत येऊनही रक्तदान करू शकता, असे ॲड.शेख शाहजेब यांनी केले आहे.

जिल्हा रुग्णालयातील रक्तपेढीत सध्या रक्ताचा ठणठणाट आहे. अशातच भारत–पाकिस्तान युद्ध सुरू झाले आहे. त्यानुषंगाने आरोग्य विभागालाही सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. यात रक्तसाठा मुबलक ठेवण्यास सांगितले आहे. याच अनुषंगाने जिल्हा रुग्णालय प्रशासनाने आवाहन केले आहे. आपण सीमेवर लढण्यासाठी जाऊ शकत नाही, पण त्यांच्यासाठी रक्ताचा एक थेंब देऊ: शकतो, अशी भावनिक साद घालत देशाच्या जवानांसाठी एक थेंब रक्ताचा द्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. जास्तीतजास्त दात्यांनी रक्तदानासाठी पुढे यावे, असे ॲड.शेख शाहजेब यांनी केले आहे.



# धम्मदीप बुद्ध विहार लोकार्पण व बुद्ध रूप प्रतिष्ठापना अनावरण सोहळ्यास मोठया संख्येने उपस्थित राहावे : ॲड. तेजस वडमारे

बीड । प्रतिनिधी

दिनांक ११/०५/२०२५ वार रविवार रोजी सकाळी ११ वाजता बीड शहरात छत्रपती शिवाजीनगर (बलभीम नगर) पालवण रोड येथे सुंदर असे नविन बुद्धविहार उभारले असून या परिसरातील सर्व धम्म प्रेमी बौद्ध उपासक उपासिका यांना जाहीर आवाहन करण्यात येत आहे की, पूज्य भन्ते धम्मशील थेरो व श्रामनेर संघ यांच्या हस्ते धम्मदीप बुद्ध विहार लोकार्पण सोहळा व तथागत भगवान बुद्धांच्या २५६९ व्या जयंतीच्या निमित्ताने भव्य बुद्ध रूपाचा उद्घाटन सोहळा होणार आहे.



या ऐतिहासिक कार्यक्रमास आपण सहकुटुंब सहपरिवार पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून या ऐतिहासिक सोहळ्यात उपस्थित राहून धम्म देसनेने लाभांवीत व्हावे, असे अवाहन विनोद मुळूक व ॲड तेजस वडमारे यांनी केले आहे. तरी छत्रपती शिवाजीनगर, बलभीम नगर, दिलीप नगर, मित्र नगर, पंचशील नगर मधील बौध्द उपासक उपासिका बालक बालिकानी या धम्मदीप बुद्ध विहाराच्या लोकार्पण सोहळ्यास मोठया संख्येने उपस्थित राहावे ही विनंती.

# श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे सोमवार रोजी विष्णु महाराज आंतरकर यांचे कीर्तन

बीड । प्रतिनिधी

विसाव्या शतकातील महान संत किसनबाबा यांच्या २७ व्या वर्षातील नववी पुण्यतिथी वैशाख शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प. विष्णु महाराज आंतरकर श्रीक्षेत्र देवाची आळंदी यांचे सोमवार दिनांक १२ मे २०२५ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे.



या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे अवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व समस्त गावकरी जुजगव्हाण यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भाद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.

# प्रशासनाचा संथ कारभारामुळे लोकसहभागातून केलेला शेतरस्ता मोकळा करण्यासाठी शेतकरी बेजार

## दुसरीकडे प्रशासनाची सस्ती अदालत म्हणजे जिल्हा प्रशासनाची प्रसिद्धी मिळवण्यासाठी केलेली स्टंटबाजी

लिंबागणेश । प्रतिनिधी
एकीकडे शेतकऱ्यांनी अतिक्रमित शेतरस्ते, पाणंद रस्ते मोकळे व्हावेत, त्यांना जलद न्याय मिळावा हा उद्देश समोर ठेवून प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या चौथ्या शुक्रवारी सस्ती अदालत हा उपक्रम तहसील कार्यालय, मंडळ मुख्यालयाच्या ठिकाणी राबवला जाणार असून याचा लाभ शेतकऱ्यांना होणार आहे अशी विविध दैनिकातून प्रसिद्धी जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात येऊन स्वत:ची पाठ थोपटून घेतली जात आहे. दुसरीकडे लोकसहभागातून तयार केलेले शेत रस्ते मोकळे करून देण्यात यावेत यासाठी वारंवार जिल्हा प्रशासन, तहसील प्रशासन यांच्या दारी खेटे मारून त्यांचे जोडे झिजले आहेत. परंतु त्यांना जिल्हा प्रशासन शेत रस्ता मोकळा करून देण्यास दिरंगाई करत आहे. त्यामुळे एकंदरीतच शेत रस्ते मोकळे करण्यासाठी राबवले जाणारे सस्ती अदालत हा जिल्हा प्रशासनाचा प्रसिद्धी मिळवण्यासाठी स्टंटबाजी असून जिल्हा प्रशासनाने जलद गतीने शेतकऱ्यांना न्याय देऊन शेत रस्ते, पाणंद रस्ते मोकळे करून द्यावेत. तसेच ग्रामीण भागात शेत वस्तीवर जाण्यासाठी दळणवळणाची साधने व मजुरांच्या हाताला काम मिळावे या उदात्त हेतूने सुरू केलेली मातोश्री ग्राम समृद्धी शेत /पाणंद रस्ते योजनेंतर्गत शेत रस्ते पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्यात यावेत, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.



मुळकवाडी– मसेवाडी शिवरस्ता मोकळा करून देण्यात यावा यासाठी शेतकऱ्यांनी आक्षेप घेतल्यानंतर ३ वर्षांपूर्वी भूमी अभिलेख कार्यालयात २१,००० रुपये मोजणी फीस भरली. त्यानंतर दोन वर्ष भूमी अभिलेखचे कर्मचारी मोजणी करण्यासाठी आलेच नाहीत. सहा महिन्यापूर्वी १ ऑक्टोबर रोजी लिंबागणेश येथे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या अध्यक्षतेखाली महसूल मंडळाची बैठक झाली होती. तेव्हा मसेवाडी येथील ग्रामस्थांनी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना लेखी निवेदन दिल्यानंतर त्यांनी भूमी अभिलेखच्या कर्मचाऱ्यांना आदेश देऊन खुणा निश्चिती करून देण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर खुणा करून दिल्या मात्र दोन तीनशे शेतकऱ्यांपैकी चार, पाच शेतकऱ्यांना त्या मान्य नसल्याने त्यांनी रस्ता अडवला असून लोक सहभागातून ४–५ लाख रुपये खर्च खर्चून ७० टक्के रस्ता तयार झाला असून केवळ अर्धा किलोमीटर रस्ता बाकी आहे. पावसाळा तोंडावर आला असुन पावसाळ्यात खते, बि बियाणे, आणि शेतातील शेतीमाल आदी ने आण करण्यासाठी अडचण येते. त्यामुळे पावसाळ्यापुर्वी महसूल प्रशासनाला आम्हाला तातडीने रस्ता मोकळा करून देण्यात यावा अशी आमची मागणी असल्याचे शाकींदर काटकर यांनी सांगितले.

पावसाळ्यात शाळा सुरू झाल्यानंतर शाळकरी मुलांना गुडघाभर चिखलातून शाळेत जायला लागतं. आठवडी बाजार, माळवं, रात्री अपरात्री दवाखान्यात जायचं म्हणलं तरी आम्हाला मोठी अडचण आहे त्यामुळे पावसाळ्या अगोदर रस्ता करण्यात यावा अशी मागणी छाया निर्मळ यांनी केली आहे.

तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी स्वत: भेट देऊन भुमि अभिलेख कर्मचाऱ्यांना ३३ फुट रस्त्यासाठी खुणा करून दिल्या होत्या.२०० शेतकऱ्यांना या मान्य असुन ४–५ शेतकऱ्यांना मान्य नसल्याने त्यांनी काम अडवल्याने ७० टक्के काम पूर्ण झाले असुन ३० टक्के काम अपूर्ण आहे. प्रशासनाने रस्ता मोकळा करण्यास मदत करावी, अशी मागणी सरपंच मुळुकवाडी रामकिसन कदम यांनी केली आहे.

ग्रामीण भागात शेतवस्तीवर जाण्यासाठी दळणवळणाची साधने व मजुरांच्या हाताला काम मिळावे या उदात्त हेतूने मातोश्री ग्राम समृद्धी शेत/ पाणंद रस्ते योजना अस्तित्वात आणली. पावसाळ्यापुर्वी शेत रस्ते पूर्ण हवेत या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले होते. रस्ते मोकळे करण्यासाठी शेतकरी शासनाच्या दरबारी वारंवार चकरा मारत असूनही त्यांना न्याय मिळत नाही. सध्या शेत रस्ते, पाणंद रस्ते मोकळे करण्यासाठी राबवली जाणारी सस्ती अदालत योजना केवळ स्टंटबाजी असून शेतकऱ्यांना प्रशासनाने तातडीने न्याय द्यावा व पावसाळ्यापूर्वी शेत रस्ते, पाणंद रस्ते पूर्ण करण्यासाठी सहकार्य करावे अशी मागणी डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर केली आहे.

# बोगस लाभार्थ्यांमुळे गरजूंची फरपट

## निराधारांची आधारासाठी धावपळ; मानधनाची प्रतीक्षा कायम

पात्रुड । प्रतिनिधी
सामाजिक सुरक्षेच्या नावावर उभ्या असलेल्या संजय गांधी निराधार योजना व वृद्धापकाळ निवृत्ती योजनेचा माजलगाव तालुक्यात अक्षरश खेळखंडोबा झालेला दिसतो आहे. खऱ्या गरजूंना लाभ देण्याऐवजी, बनावट लाभार्थ्यांनी यात शिरकाव करून वास्तविक गरजू वयोवृद्धांचे जगणे अधिकच त्रासदायक बनवले आहे. सध्या अनेकांना तहसील कार्यालयाच्या पायऱ्या झिजवाव्या लागत आहेत.

तालुक्यात अनेक तरण्याताठ्या लोकांनी अकाली प्रौढत्वाचे कातडे पांघरले. आधारकार्डात जन्मतारीख बदलून वय वाढवून स्वत:ला ६५ वर्षांचे दाखवले आहे. अनेक तरुण विवाहित महिलाही यात सामील असून लग्नाच्या थोड्याच दिवसांत लाभार्थी म्हणून त्यांची नावे नोंदवली गेली आहेत. हे सर्व व्यवहार दलालांमार्फत आणि काही राजकीय छत्रछायेखाली घडल्याचे स्थानिकांकडून बोलले जात आहे. खऱ्या वृद्धांची ससेहोलपट या बेकायदेशीर घडामोडींमुळे खरेच या जगणारे वृद्ध तहसील कार्यालयात हेलपाटे खात आहेत. काहींचे आधारकार्ड अद्याप अपडेट नाहीत. तर काहींकडे मोबाइल फोनच नाही. तहसीलच्या दरवाज्यापाशी ते तासन्तास उभे राहून ओटीपी मिळत नाही, नेटवर्क येत नाही, अशा तक्रारी करताहेत. ऊन तापलेले, थकलेल्या अंगात त्राण नाही. पण मानधनासाठी रोज नव्या अपेक्षेने त्यांची पावले पुढे पडतात. येथे जणूकाही त्यांची दररोज जत्राच भरली असते.बँक खात्यांचा गुंता, पैशाचा नाही ठावठिकाणा बँक खात्याशी आधार लिंक नसणे किंवा एकाच व्यक्तीचे अनेक खात्यांशी लिंक असणे, यामुळे मिळणारे मानधन अनेकांच्या खात्यात जमा होतच नाही. काही केसेसमध्ये तर दुसऱ्याच खात्यात पैसे जमा झाल्याचे समोर आले आहे. त्यामुळे लाभार्थ्यांना तहसीलसोबतच बँकांच्या चकरा माराव्या लागत आहेत.

उन्हातान्हात होपरळ बोगस लाभार्थ्यांमुळे खरे गरजू वृद्ध तहसील कार्यालयाचे उंबरठे झिजवित आहेत. अनेक वयोवृद्धांकडे मोबाइल नाही, आधार अपडेट नाही, तर काहींचे बँक खाते लिंक नसल्यामुळे त्यांना दिवसभर तहसील कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागत आहेत. कधी नेटवर्क बंद तर कधी ओटीपी येत नाही, या चक्रात त्यांची घालमेल वाढली आहे. उन्हातान्हात, वयोवृद्ध महिला व पुरुष तहसील कार्यालयाच्या दारात थकून बसलेले दृश्य पाहून मन हेलावल्यावाचून राहत नाही. कृत्रिम म्हाताऱ्यांनी आपल्या आधारकार्डात वय बदलून घेतले आहे. काहींनी आडनावात फरक घातल्याने आता नवीन सुरू असलेल्या घरकुल सर्वेतही अडचणी निर्माण झाल्या आहेत. बँक खात्याशी आधार लिंकिंगमध्ये झालेल्या घोळामुळे अनेक लाभार्थ्यांना गेल्या काही महिन्यांपासून मानधन मिळालेले नाही. आमचे पैसे आम्ही ज्या खात्याचा नंबर दिला आहे त्यातच जमा व्हावेत, अशी मागणी नागरिकांनी खासदार व आमदारांकडे केली आहे. बँक व संबंधित विभागांशी समन्वय साधून याला तातडीने तोडगा काढावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**प्रशासनाचे दुर्लक्ष आणि नागरिकांचा संताप**
तहसील कार्यालयातील कर्मचारी स्वत: ही गोंधळात असून पैसे कुठल्या खात्यात गेले, आम्हाला माहिती नाही अशी बिनधास्त उत्तरे दिली जात आहेत. त्यामुळे नागरिक नाराज आणि संतप्त होत आहेत. आधार क्रमांकाऐवजी त्यांनी तहसीलला दिलेल्या खात्यावरच पैसे जमा करावेत, म्हणजे गैरव्यवहाराला आळा बसेल आणि ख्रया लाभार्थ्यांचा पैसा योग्य ठिकाणी पोहोचेल, अशी त्यांची मागणी आहे.

# पाईपलाईन फुटीचे प्रकार थांबवून पाणीपुरवठा सुरळीत करावा : मोगरकर

परळी वैजनाथ । प्रतिनिधी
महामार्गाचे काम करणाऱ्या कंत्राटदाराच्या हलगर्जीपणामुळे परळी शहराला पाणीपुरवठा करणारी जलवाहिनी फुटल्याने गणेशपार सह गावभागात आठ दिवसांपासून पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. वारंवार होणाऱ्या पाईपलाईन फुटीच्या घटना त्वरित थांबवून किमान उन्हाळ्यात तरी पाणीपुरवठा सुरळीत रहावा व पाईपलाईन फोडणार्यावर कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी भाजपा पदाधिकारी अश्विन मोगरकर यांनी मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे यांच्याकडे केली आहे.

परळी शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या वाण धरणात मुबलक पाणीसाठा असूनही नियोजना अभावी व वारंवार होणाऱ्या पाईपलाईन फुटीमुळे नागरिक हैराण झाले आहेत. थर्मल कॉलनी जवळील रस्ते महामार्गाचे काम चालू असलेल्या ठिकाणी हलगर्जीपणामुळे परळी शहराला पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन फुटल्याने आठ दिवसांपासून गावभागाला पाणीपुरवठा बंद आहे. यापूर्वीही अनेकवेळा विविध ठिकाणी पाईपलाईन फुटल्याच्या घटना घडल्याने नागरिकांना नाहक त्रास होत आहे. याबाबतीत अश्विन मोगरकर यांनी प्रशासनाकडे तक्रार करून पाणीपुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली. पाईपलाईन दुरुस्तीचे काम पूर्ण करून गावभागात पाणी येईल असे पाणीपुरवठा अभियंता साळवे यांनी सांगितले. वारंवार पाईपलाईन फुटण्याच्या घटनेत वाढ होत असल्याने नागरिकांना कृत्रिम पाणीटंचाईला सामोरे जावे लागत असल्याने यावर त्वरित कार्यवाही करण्याची मागणी भाजपा पदाधिकारी अश्विन मोगरकर यांनी मुख्याधिकारी यांच्याकडे केली आहे.

# बीड नगर परिषदेने शहरातील नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नये : शेख निजाम

## आजपासून सुरळीत पाणीपुरवठा होणार : मुख्याधिकारी नीता अंधारे

बीड । प्रतिनिधी
मागील सहा महिन्यापासून बीड शहरांमध्ये नगरपरिषदेच्या नाकर्तेपणामुळे व नियोजन शून्यते मुळे झालेल्या अभूतपूर्व पाणी पुरवठाच्या संदर्भात बीड शहरातील सर्वसामान्य नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात रोष निर्माण झाला होता त्याच अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शेख निजाम व लोकपत्रकार भागवत तावरे,युवा नेते बळी गवते यांच्या नेतृत्वाखाली बीड नगरपरिषद प्रशासना विरोधात भव्य हंडा मोर्चाचे आयोजन दिनांक ९ मे २०२५ रोजी करण्यात आले होते.

सदरील मोर्चामध्ये बीड शहरातील सर्वपक्षीय नेते नगरसेवक शेख अमर, मुन्नाभाई इनामदार, सय्यद इलियास, कय्युम इनामदार, आयुब पठाण, सय्यद फहीम, सय्यद आझम, शेख हमीद, शहबाज कादरी, सत्तार इनामदार, शेख कदीर, शेख जाकीर, सादिक पठाण, शेख पाशा, जयंत वाघ यांच्या सहित हजारो सुजाण नागरिक व महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

सदरील मोर्चा च्या निमित्ताने उपस्थित असलेल्या भारतीय जनता पार्टीचे मा.जिल्हा परिषद अध्यक्ष मीरा ताई गादले, शहराध्यक्ष अशोकजी लोढा, भारतीय जनता पार्टीच्या ॲड. संध्याताई राजपूत, नगरसेवक सय्यद इलियास, मुन्ना इनामदार, रुपाली देशपांडे, पठाण रेहानाताई, प्रीतताई कुकडेजा, सोनलताई पाटील आदी आदींनी पाणीपुरवठा स्वच्छता व नगर परिषदेच्या गैरव्यवहार बाबत संबोधित केले.

यावेळी बोलताना लोकपत्रकार भागवत तावरे यांनी बीड नगर परिषदेमध्ये एकूणच चाललेला निरंकुश गैरव्यवहार व त्यामुळे होणारी बीड शहरातील नागरिकांची हेळसांड या प्रश्नावर आपले सविस्तर मत मांडले व सदरील मोर्चाचे आयोजक शेख निजाम यांनी आपल्या संबोधनांमध्ये बीड नगर परिषदेने आपले कर्तव्य समजून बीड नगरपरिषदेच्या माध्यमातून शहरातील नागरिकांकरिता पायाभूत सुविधा उपलब्ध करून द्यावा ज्यात प्रामुख्याने विस्कळीत असलेला पाणीपुरवठा सुरळीत करून किमान आठ दिवसाला शहराला पाणीपुरवठा करण्यात यावा येणाऱ्या पावसाळ्यापूर्वी बीड शहरात विशेष स्वच्छता मोहीम राबवून युद्ध पातळीवर नालेसफाई व कचऱ्याची विल्हेवाट व व्यवस्थापन करण्यात यावे व बीड शहरातील बंद अवस्थेत असणाऱ्या सर्व पथदिवे चालू करण्यात यावे अशा मागण्या वेळ मुख्याधिकारी नीता अंधारे यांना निवेदनात दिलेल्या मागण्या पालकमंत्री अजित पवार यांच्या सूचनेनुसार मान्य केल्या व तात्काळ आजपासून सुरळीतपणे पाणीपुरवठा व स्वच्छता व ईतर सर्व कामे पूर्ण करून करू अशी ग्वाही शिष्टमंडळास दिली. यावेळी भव्य हंडा मोर्चात मोठ्या संख्येने शहरातील नागरिक उपस्थित होते व यामध्ये महिलांची संख्या मोठ्या प्रमाणात होती.




# युवा नेते अक्षय मुंदडा यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रम रद्द

केज । प्रतिनिधी
भारतीय जनता पार्टीचे युवा नेते अक्षय मुंदडा यांनी स्वत:च्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेले सर्व कार्यक्रम देशात सुरू असलेल्या युध्दजन्य परिस्थितीमुळे रद्द केले असून कुठलेही जाहीर कार्यक्रम होणार नसल्याचे संयोजकांनी सांगितले.



दरम्यान 'चला हवा येऊ द्या' आणि 'मराठी पाऊल पडते पुढे' हे दोनही कार्यक्रम युध्द संपल्यानंतर निश्चित घेवू अशी माहिती भाजपाचे शहराध्यक्ष संजय गंभीरे यांनी दिली. राजकारण करताना देशभक्तीतली संवेदनशिलता कशी जपल्या जाते याचे आदर्श उदाहरणच म्हणावे लागेल. दि.१३ मे रोजी भाजपा चे युवा नेते अक्षय मुंदडा यांचा वाढदिवस असून त्यानिमित्ताने शहरात कार्यकर्त्यांनी विविध कार्यक्रमाचे केले होते. ज्यामध्ये चला हवा येऊ द्या, प्रसिध्द अभिनेते निलेश साबळे यांचा कार्यक्रम तर मराठी पाऊल पडते पुढे आदी सांस्कृतिक कार्यक्रम दि.१३ मे ला शहरात होणार होता.

पक्षाच्या कार्यकर्त्यांनी पुर्व तयारी जोरदार केली होती. त्यासाठी मध्यवर्ती असलेल्या सेंट अँथोनी शाळेचे मैदान पण निवडले होते. मात्र दोन दिवसापासून पाकिस्तान सोबत सुरू झालेले युध्द त्यानंतर संपूर्ण देशात निर्माण झालेल्या युध्दजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अक्षय मुंदडा यांनी स्वत:च वाढदिवसा निमित्त आयोजित केलेले सर्व कार्यक्रम रद्दकरण्याच्या सुचना आपल्या सहकारी कार्यकर्त्यांना केल्या असून कोणीही मोठा गाजावाजा करत कार्यक्रम करू नये असे सांगितले त्यामुळे चला हवा येऊ द्या हा कार्यक्रम रद्द करण्यात आला. दरम्यान सद्यस्थितीत कार्यक्रम रद्द झाला असला तरी, याच सांस्कृतीक कार्यक्रमाची मेजवाणी आम्ही निश्चितच युध्दजन्य परिस्थिती संपल्यानंतर शहर वासियांना देणार असल्याचे भाजपाचे शहराध्यक्ष संजय गंभीरे यांनी सांगितले. दि. २२ एप्रिल रोजी पाकिस्तानी दहशतवादी यांनी पहलगाम येथे दुष्कर्म घडवले होते ज्यांला पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वाखाली दृढ निश्चय तथा सैनिकाच्या शौर्याने योग्य उत्तर देणे चालू आहे. मात्र या सर्व पार्श्वभूमीवर वाढदिवस साधेपणाने साजरा करण्याचे मुंदडांनी कळवत आपल्यातली संवेदनशीलता दाखवली.

## चला हवा येऊद्या कार्यक्रम पुन्हा होणार : शहराध्यक्ष संजय गंभीरे

# आ.धनंजय मुंडे यांच्या हस्ते शक्ती ट्रेडर्सचे उद्या उद्घाटन

सिरसाळा । प्रतिनिधी
राज्याचे माझी मंत्री आ. धनंजय जी मुंडे साहेब यांच्या शुभहस्ते शक्ती ट्रेडर्सचे उद्याला उद्घाटन होत असून यावेळी पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान शैलेश (भैय्या) शंकरराव केंद्रे व गजेंद्र शंकरराव केंद्रे यांनी केले आहे. उद्या दिनांक ११.५.२०२५ रोजी रविवारी सकाळी ११.०० वाजता बीड परळी रोड अनुसया पेट्रोल पंप शेजारी शिरसाळा येथे शक्ती टेंडर्स आमदार धनंजय मुंडे यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार आर टी जीजा देशमुख, माजी आमदार संजय भाऊ दौंड, अपोलो टेंडरचे विक्री अधिकारी अरविंद नाईक, विक्रेता अविनाश जगताप आदीसह मान्यवर उपस्थित राहणार रहावे असे आव्हान शैलेश (भैय्या) शंकरराव केंद्रे व गजेंद्र शंकरराव केंद्रे यांनी केली आहे.



हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड–४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१–७–३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED- 431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT